International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# आदिवासी संस्कृती आणि कलाविष्कार

**प्रा. आकांक्षा भगवानराव सोनवणे**
*मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड*
*Corresponding Author – प्रा. आकांक्षा भगवानराव सोनवणे*
**DOI - 10.5281/zenodo.17656803**

**प्रस्तावना :**

संस्कृती ही मानवाच्या जीवनशैली, मूल्ये, विश्वास आणि प्रथा यांचे एकसंधित प्रतिबिंब आहे. जगभरात वैविध्यपूर्ण संस्कृती आपणास पाहण्यास मिळतात. संस्कृतीच्या विविधतेतून जगभरातील कला, भाषा, परंपरा व साहित्याची संपन्नता दिसून येते.

प्रत्येक मानवी समूहाची एक संस्कृती असते. संस्कृतीमुळे प्रत्येक समाजाचे एक वेगळेपण दिसून येते. संस्कृती ही व्यक्तीला, समाजाला आपुलकीची भावना, अभिमान व अस्मिता देते.

संस्कृती ही एक गतिमान व विकसित होत जाणारी संकल्पना आहे. ज्यामध्ये कला, भाषा, परंपरा, चालीरीती, संगीत, साहित्य आणि सामाजिक प्रथा यासह मानवी अनुभवांचे सर्व पैलू समाविष्ट आहेत. कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचा वारसा हा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतो, म्हणून मानवी संस्कृती ही प्रवाही असल्यामुळे ती सातत्याने पण नकळतपणे थोडी थोडी बदलत जाते.

समाज व संस्कृती हे दोन घटक परस्पराश्रयी असून दोघांमध्ये दृढ समन्वय आढळून येतो. मानवी संस्कृतीविषयी अगदी मुळापासून जाणून घेण्यासाठी आदिवासींच्या संस्कृतीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**आदिवासी संस्कृती:**

आदिवासींची संस्कृती ही जागतिक पातळीवरील एक आदर्श संस्कृती आहे. निसर्ग आणि जीवनाबद्दलचे प्रेम हे आदिवासी संस्कृतीचे स्वाभाविक वैशिष्ट्य आहे. शिल्पकला, चित्रकला, मातीकाम, विणकाम, रंगकाम, लाकूडकाम, बांधकाम, मुखवटे, वेशभूषा, केशभूषा, गोंदणकला, दागिने तयार करणे इत्यादी कला अवगत असलेला आदिवासी समाज हा एक वैशिष्ट्यपूर्ण असा समाज आहे.

आदिवासींच्या जीवनाचे प्रतिबिंब हे त्यांच्या कलेत दडलेले आहे. आदिवासी समाज हा निसर्गाची पूजा करणारा समाज आहे. सूर्य, चंद्र, तारे, डोंगर, नद्या, पशू, पक्षी, धरती इत्यादी निसर्गातील घटकांनाच ते देव मानतात. आदिवासींची लोकगीते, लोककला हा त्यांच्या संस्कृतीचा ठेवा आहे. या समाजातील विधी-परंपरा देखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मूल जन्माला आल्यानंतरचा कार्यक्रम, लग्नविधी, यात्रा अशा अनेक पारंपारिक विधींमध्ये लोकगीतांना, लोककलेला महत्त्वाचे स्थान असते.

आदिवासी सर्व सण-उत्सव अत्यंत उत्साहाने साजरा करतात. रूढी -परंपरा, सण-उत्सव, निसर्गपूजा,

कलाविष्कार, कुलदैवत, लग्नविधी यामधे आदिवासींची संस्कृती दडलेली आहे.

समूहजीवन हे आदिवासी संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. आदिम अवस्थेत आदिवासी समाज हा टोळी करून राहत असे. अन्नाच्या शोधात किंवा शिकारीसाठीआदिवासी लोक समूहाने जात असत. एखाद्या हिंस्र प्राण्यापासून संरक्षण करण्यासाठी किंवा प्रतिकार करण्यासाठी समूहाने राहणे अनिवार्य होते.

आदिवासी समाजामध्ये गोंड, कोरकू, ठाकर, भिल्ल, पारधी, वारली, माडिया, पावरा, काकणी, कातकरी, धोंडिया, कोलाम, परधान, महादेव कोळी, तडवी, गावीत, आंध, काथोळी, राजगोंड अशा अनेक जमाती आढळून येतात. थोडक्यात, आदिवासी संस्कृती ही सहकार्य, श्रम आणि समूहजीवन या मूल्यांचे जतन करणारी संस्कृती आहे. या संस्कृतीमध्ये मानवी मूल्यांचा मोठा साठा आहे.

**आदिवासी संस्कृतीतील कलाविष्कार :**

मानवी जीवनात कलेला महत्त्वाचे स्थान आहे. मानवी जीवनात कलानिर्मितीची प्रेरणा आदिम काळापासून आहे. अगदी गुहांमध्ये राहणाऱ्या आदिमानवापासून ते आजच्या काळातील मानवाच्या कल्पनाशक्तीचा कलात्मक आविष्कार प्रत्येक टप्प्यावर झालेला दिसतो. कलेचे स्वरूप हे विविधतेने नटलेले असते. नृत्य, संगीत, चित्र, शिल्प, कथा, कविता इत्यादी रूपांतून कला ही दिसून येते. आदिवासी संस्कृतीतही कलेला महत्वपूर्ण स्थान आहे. आदिवासी कलाप्रकारांमध्ये विविधता व विपुलता आढळते. नृत्य, नाट्य, संगीत, विधिनाट्य, रंगचित्रे, शिल्प, वास्तुकला, कोरीवकाम इत्यादी प्रयोगात्मक कला, तसेच लोककथा, दंतकथा, लोकगीते, काव्य अशा अनेक शाब्दिक कलाप्रकारांमधून आदिवासी कलाविष्कारांची व्याप्ती दिसून येते. या कला आदिवासींच्या जीवनानुभवांतून, संस्कृतीतून, जीवनशैलीतून उदयास आलेल्या आहेत.

आदिवासी कलांचा उपयोग हा त्या समाजाच्या रूढी-परंपरा, वाङ्मय, पार्श्वभूमी ही पुढील पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी केला जातो. आदिवासींची कलानिर्मिती ही निसर्ग व निसर्गातील घटकांवर आधारलेली आहे. त्यांची कल्पनाशक्ती ही निसर्गाभोवती फिरते. त्यामुळे निसर्ग हा आदिवासींच्या कलानिर्मितीमागील एक प्रेरणास्रोत आहे, असे म्हणता येईल.

आदिवासींच्या कलांमधून त्यांचे निसर्गाशी असलेले नाते, सामाजिक मूल्ये व जीवनदृष्टी प्रतिबिंबित होते.

**आदिवासी नृत्य:**

आदिवासी कलाप्रकारांमध्ये नृत्य हा अविभाज्य असा कलाप्रकार आहे. आदिवासी जमातींमध्ये सण-उत्सवात नृत्य करण्याची प्रथा आहे. तसेच श्रमाचा थकवा घालवण्यासाठी मनोरंजन म्हणून देखील नृत्य केले जाते. आदिवासींच्या लोकनृत्यातून त्यांच्या अनेक प्रवृत्तींचे दर्शन घडते. धार्मिक भावना, लढाऊवृत्ती, शौर्यदर्शन, शृंगार इत्यादी गोष्टी ते आपल्या नृत्यातून दर्शवतात.

आदिवासी लोकनृत्य हा प्रसिद्ध असा कलाप्रकार आहे. तारपानाच, कांबडनाच, गौरीनाच, ढोलनाच, घोरनाच, बोहडा, शिकारीनृत्य, बारवनृत्य, डाहाका, दंडार, दिंडणनृत्य, करमानृत्य असे अनेक नृत्यप्रकार आदिवासी समाजात प्रचलित आहेत. तारपा हे वारली जमातीतील नृत्य आहे. घोरनाच म्हणजे टिपऱ्यांचा नाच होय. डहाका हा सामूहिक नृत्यप्रकार आहे. ढोल नाचात कसरतीचा खेळ दाखवला जातो.

अशाप्रकारे आदिवासींच्या प्रत्येक नृत्यप्रकाराची वेगवेगळी वैशिष्ट्य आढळतात.

**आदिवासी वाद्य :**

आदिवासींचे नृत्य व संगीतकला यांना साथ देणारा मुख्य घटक म्हणजे आदिवासींचे वाद्य होय. ढोल, डफ, नगारा, तुणतुणे, घुंगरू, टिपऱ्या, तारपा, पावा, घांगळी, मांदोळ, ताशा असे विविध प्रकारचे वाद्य आदिवासी लोक वापरतात. विशेष म्हणजे ही वाद्ये आदिवासी लोक स्वतः तयार करतात. ही वाद्ये प्राण्यांच्या कातडीपासून, लाकडी काठ्या, मातीची भांडी, लाकडाचा ओंडका, पोकळ बांबू, हरणाचे शिंग, दुधी भोपळा, लोखंडी तारा, तांब्याच्या तारा इत्यादी घटकांपासून बनवलेली असतात. नृत्य, संगीत व वादन हे आदिवासींच्या जीवनातील अविभाज्य असे घटक आहेत व या कला एकमेकांना पूरक आहेत.

**इतर कला :**

लाकडावरील कोरीव काम, भिंतीवरील चित्रकला, दागिने बनवण्याची कला, धातूच्या कोरीव मूर्ती इत्यादी कला आदिवासी संस्कृतीत प्रचलित आहेत. तसेच आदिवासींची बांबूपासून दैनंदिन उपयोगात येणाऱ्या वस्तूंची कलात्मक निर्मिती देखील प्रसिद्ध आहे. शिकारीसाठी लागणारी हत्यारे व जाळे ते आपल्या हातानेच तयार करतात.

**वारली चित्रकला :**

वारली ही आदिवासींची वैशिष्ट्यपूर्ण चित्रकला म्हणून प्रसिद्ध आहे. वारली आदिवासींची चित्रकला, चित्रविषय, चित्रशैली आणि ती ज्या सामाजिक सांस्कृतिक संदर्भात आकाराला येते, ते संदर्भ पाहिल्यास त्यातून त्यांची संस्कृती, श्रद्धा, विश्वास, दृष्टिकोन, भावना व आदर्श यांचे दर्शन घडते.

साधेपणा, त्यातील सौंदर्य आणि निर्मळपणा ही या कलेची वैशिष्ट्ये आहेत. आदिवासींना सतत निसर्गसानिध्यात राहण्याची सवय असल्याने, निसर्गातील सुसंवादी आणि मोहक आकार त्यांना प्रेरणा देतात. वारली आदिवासींच्या घरांच्या भिंतीवर समृद्ध, संपन्न निसर्गाची आणि आनंदी, स्वच्छंदी जीवनाची विविध रूपे चित्रित केलेली आढळतात. या जमातीचे लोक घराच्या भिंतींना चित्रांनी सजवतात. या चित्रांत दैनंदिन जीवनातील विविध प्रसंग, सण-उत्सव, नृत्यसमारंभ इत्यादी संदर्भ अनुभवता येतात.

वारली चित्रातील आकारांना स्वतंत्र ओळख आहे. या चित्रांतील रचना गोल, त्रिकोण, चोकोन इत्यादी मुलभूत भौमितिक आकारांचा वापर करून केल्या जातात. बहुतांशवेळा सारवलेल्या भिंतींचा रंग व पांढरा रंग या दोन रंगाने वारली चित्र पूर्ण केले जाते. याशिवाय वारली चित्रकलेत पशू, पक्षी, झाडे व इतर नैसर्गिक घटकांची चित्रेही काढली जातात.

**समारोप :**

सामाजिक संस्थांच्या उगमाबद्दल आणि मानवी व्यवहारांच्या मूलतत्वांबद्दल मांडणी करताना आदिवासींच्या संस्कृतीचे आकलन करून घेणे आवश्यक आहे.

आदिवासी संस्कृती हा जीवनाचा पाया मानून आदिवासी आपले जीवन जगतात. आदिवासींची कला ही त्यांना निसर्गाकडून मिळालेली देणगी आहे. त्यात सहजता आहे, सुंदरता आहे. आदिवासींच्या जगण्यातील मूल्ये त्यांच्या कलांमधून सहज डोकावतात. आदिवासी कलांमधून सामाजिक जाणिवा

आणि सांस्कृतिक मूल्ये प्रतिबिंबित झालेली आढळतात.

भारतीय संस्कृती, कलाविश्व आणि सौंदर्य कल्पना समजून घेण्यासाठी भारतातील आदिवासी संस्कृती व कलाविश्व समजून घेणे अनिवार्य आहे.

**संदर्भ :**


१) डॉ. वाल्हेकर ज्ञानेश्वर - आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास- स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

२) डॉ. जाधव सुधाकर - भारतातील आदिवासी समाज- चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

३) बोखारे नरेंद्र विश्वनाथ (२००३) - आदिवासी कलाविष्कारातील सौंदर्यसंप्रषण -संज्ञापनविद्या व ललितकला- संपादक रमेश नारायण वरखेडे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

४) डॉ. विनायक तुमराम - आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा - विजय प्रकाशन, नागपूर.